क्र : मविनिआ/माअअ/९४/२०१७/४८१२ दि. ३०.११.२०१७

प्रति,
श्री जगनसिंह राजपूत,
ओमसाई निवास, बॅरेक नंबर ८, रुम नंबर ४,
उल्हासनगर- १, जि - ठाणे.

विषय :- आपला दि. ०२.११.२०१७ रोजीचा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत अर्ज.

महोदय,

आपला दि. ०२.११.२०१७ रोजीचा माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ६ (१) प्रमाणे केलेला अर्ज आयोगाच्या कार्यालयास दि. ०३.११.२०१७ रोजी प्राप्त झालेला आहे. आपणांस आवश्यक असलेला माहितीचा तपशील खालीलप्रमाणे नमूद केलेला आहे.

| No | Information Sought | Information Provided |
|---|---|---|
| 1 | विज वितरण कंपनीचे अधिकारी व कर्मचारी विज कायदा 2004 चुकीचा लावले असल्यामुळे गरीब ग्राहकाकडे न्यायालयात जाण्यासाठी व कोणत्याही मुंबई सारख्या ऑफिस मध्ये जाण्यासाठी पुरावे असताना जाऊ शकत नाही म्हणून असा ग्राहक साजीआरएफ किंवा विद्युत लोकपालकडे तक्रार करु शकतो का त्याची स्वाक्षरी प्रत मिळावी. | For your quires you may refer MERC (Supply Code) Regulations, 2005. which is available free of cost in downloadable format on Commission's websites www.merc.gov.in and www.mercindia.org.in |
| 2 | कोणत्याही ग्राहकाने जागा खरेदी केली व त्याजागी नविन कनेक्शन हवे असल्यास त्या जागी पुर्वीचा ग्राहकाचा 3 वर्षाच्या पुर्वीचे किंवा 1999, 200, 2004 या 2010 या वेळेसची थकबाकी असल्यास ते भरल्याशिवाय नविन कनेक्शन ती जागा खरेदी करणा-यास मिळणार नाही असा नियम असल्यास किंवा कोर्टाचा आदेश या जिआर असल्याची स्वाक्षरी प्रत मिळावी. | जर ग्राहकांच्या वैयक्तिक स्वरुपाच्या तक्रारी असतील तर त्यासाठी आयोगाने ग्राहक तक्रार निवारण या यंत्रणेची निर्मिती केलेली आहे (CGRF) प्रकरणारुप ग्राहक त्यांच्या तक्रारीसाठी या यंत्रणेकडे दाद मागू शकतो.<br><br>Copy of MERC (CGRF & EO) , Regulations, 2006, which are available in downloadable format on Commission's websites www.merc.gov.in and www.mercindia.org.in |
| 3 | सदरची माहिती पूर्ण ग्राहकास व जनतेस उपयोग यावी म्हणून आम्ही ही माहिती आहोत व त्याचे पुरावा हि पाठवत आहे तो पाहून आपण माहिती द्यावी हि नम्र विनंती ग्राहक क्र. 021513208526 महिला व्यक्ती असून ती जिवीका चालावी म्हणून सदर जागा भाड्याने दिली असता भ्रष्टाचारी अधिकाऱ्याने घर असतांना तिथे विज कायदा 2003 चा वापर चुकीचा करुन घर असताना सीएल वापर दाखवण्यात आला कोणताही पंचनामा नाही. मालकाची सही नाही. जेव्हा रिकव्हरी बिलामध्ये बाकी लावण्यात आली तेव्हा ग्राहकांनी व्हीडीओसह प्रथम अपिलीय अधिकारी श्री गवळी यांना विनंती केली पण 30 दिवस झाले आहेत. आपला अर्ज मान्य नाही म्हणून अन्याय करण्यात येत आहे असा महिला गरीब ग्राहक न्यायदृष्टीने कोठे न्याय मागू शकतो त्याची स्वाक्षरी प्रत मिळावी. आपल्या विज नियामक आयोगला ही व्हीडीओ पाठवला आहे सदर ग्राहक घर व व्यवसाय सर्क्युलर नंबर 175 मध्ये येते. | |

सदर उपलब्ध करुन दिलेली माहितीबद्दल आपले समाधान न झाल्यास आपण प्रथम अपीलीय अधिकारी श्री अनिलकुमार उके, उपसंचालक (विधी), महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, मुंबई यांचेकडे सदर पत्र प्राप्त झाल्यापासून 30 दिवसाच्या आत प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे अर्ज सादर करणे आवश्यक आहे.

आपला विश्वासू,

(प्रदिप मोहरे)
जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी